भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2024 ◑ CS 438766

THIS DOCUMENT CONTAINS 14 PAGES

TREASURY OFFICE NASIK
29 NOV 2024
STPHC ATO

NOTARY A. G. BAFANA MAHARASHTRA GOVT. OF INDIA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

NOTED & Registered at Serial Number 538/2024 12/12/2024

(1)

विभाग क्र.: १२.२

मुल्यांकन दर रु. ३४,५००/- प्रति चौ.मी.

मुल्यांकन रु.: १७,९६,०००/-

करारनामा रु.: १८,००,०००/-

मुद्रांक शुल्क रु.: १,०८,०००/-

||श्री||

**फ्लॅट विक्री करारनामा**

फ्लॅट विक्री करारनामा आज दिनांक १२ माहे डिसेंबर इसवी २०२४ म्हणजे १२/१२/२०२४ ते दिवशी नाशिक मुक्कामी...

A. G. BAFANA
Advocate & Notary
16, Suyojit Trade Centre, Below Lokmat Office, B/h Niranjan Plywoods, Sharanpur Road, Nashik-2
E.D.22/9/2025

CK Sahoo

CK Sahoo

A. G. BAFANA
Advocate & Notary
16, Suyojit Trade Centre, Below Lokmat Office, B/h. Niranjan Plywoods, Sharanpur Road, Nashik-2
E.D.22/9/2025

## जोडपत्र–२

दस्ताचा प्रकार/अनुच्छे क्र. : ६ ३

दस्त नोंदणी करणार आहेत का : होय/नाही

असल्यास दुय्यम निबंधक कार्यालयाचे नांव :

मिळकतीचे वर्णन :-

मोबदला रक्कम

मुद्रांक शुल्क रक्कम :

मुद्रांक विकत घेणा–याचे नांव व पत्ता : [illegible]

दुस–या पक्षकाराचे नांव : S.BI BANK
NSK

हस्ते असल्यास नांव व पत्ता : [illegible]

मुद्रांक विक्री नोंदवही अनुक्रमांक व दिनांक : [illegible]

मुद्रांक विकत घेणा–याची सही :

प. क्र –१०/१९९० नाशिक

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून सहा महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

NOTA… BAF… OVT.

| | | |
|---|---|---|
| १) श्री. कुमूदा शत्रुघन शाहू | ) | |
| वय: ४६ वर्षे, धंदा: नोकरी, | ) | |
| PAN NO. BALPS1082G | ) | |
| २) सौ. चंद्रिका कुमूदा शाहू | ) | |
| वय: ४० वर्षे, धंदा: गृहीणी, | ) | **लिहून घेणार** |
| PAN NO. EYSPS4680E | ) | |
| दोघे रा.: रुम नं. २, लकी रेसिडेन्सी, | ) | |
| ओमकार संकुल जवळ, शिवाजी नगर, | ) | |
| गंगापुर, नाशिक-४२२२२२ | ) | |

यासी

| | | |
|---|---|---|
| के बी कन्स्ट्रक्शन्स तर्फे भागिदार | ) | |
| PAN NO. ABAFK2939H | ) | |
| श्री. सुरेश प्रभाकर क्षिरसागर | ) | **लिहून देणार** |
| वय: ५४ वर्षे, धंदा: व्यापार, | ) | |
| मो. नं. ९८२२५०६१३० | ) | |
| फर्म पत्ता.: शॉप नं. १०, व्हाईट हाऊस बिल्डींग, | ) | |
| शरणपुर त्रंबक लिंक रोड, नाशिक-४२२००२ | ) | |

कारणे फ्लॅट विक्री करारनामा लिहून व नोंदवुन्न देतात,

१) **मिळकतीचे वर्णन:-** तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी, नाशिक महानगरपालिका नाशिक यांचे हद्दीतील, नाशिक सब-रजिस्ट्रार हद्दीतील, मौजे गंगापुर या गावचे शिवारातील सर्व्हे नं. १२४/२/१ या मिळकतीमधील अंतिम मंजुर

CK sahoo

A. G. BAFANA
Advocate & Notary
16, Suyojit Trade Centre, Below Lokmat Office,
B/h Niranjan Plywoods, Sharanpur Road, Nashik-2
E.D.22/9/2025

(३)



ले-आऊटपैकी प्लॉट नं. ३१ यासी क्षेत्र २८८.०० चौ.मी. यासी सिसनं. २१४७ क्षेत्र २८८.०० चौ.मी. + टिडीआर यावर नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेकडील मंजुर बांधकाम पत्र क्र. LND/BP/B1/BP/62 दिनांक: १४/०६/२०२३ अन्वये बांधकाम सुरु केलेल्या स्वामी निवास या इमारतीतील तिसरा मजल्यावरील फ्लॅट नं. ३०२ (१बीएचके) यासी कारपेट क्षेत्र ३७.६२ चौ.मी. + बाल्कनी क्षेत्र ५.७५ चौ.मी. सदर फ्लॅटचे सविस्तर वर्णन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आलेले आहे व प्लॉट मिळकतीचे सविस्तर वर्णन परिशिष्ट-१ मध्ये केलेले आहे.

२) उपरोक्त वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही लिहून देणार यांचे स्वतंत्र खरेदी मालकीची व प्रत्यक्ष कबजे उपभोगातील असुन, सदर प्लॉट मिळकत त्यांनी विजया मोतीलाल जैन उर्फ विजया मोतीलाल ओस्तवाल यांचेकडून दिनांक: ०८/०५/२०२३ रोजी कायम फरोक्त खरेदी घेतलेली असुन, सदर दस्त मे. दुय्यम निबंधक सो., नाशिक-४ यांचे कार्यालयात अ. क्र. ५२०५ अन्वये नोंदविलेले आहे. त्याप्रमाणे रेव्हेन्यु रेकॉर्डला मालक कबजेदार सदरी त्यांच्या नावाची नोंद दाखल झालेली आहे. सदर प्लॉट मिळकतीची लिहून देणार यांना व्यवस्था विल्हेवाट लावण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे.

३) तदनंतर परिशिष्ट-१ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीवर लिहून देणार यांनी मौजे पिंपळगाव बहुला, ता. जि. नाशिक येथील गट नं. १८२/२ मधील एकुण टि.डी.आर. क्षेत्रापैकी ५३.००

A. G. BAFANA
Advocate & Notary
16, Suyojit Trade Centre, ... Office,
B/h. Niranjan Plywoods ... Road, Nashik-2

(8)

चौ.मी. क्षेत्र हस्तांतरणीय विकास हक्क (टि.डी.आर.) अमृता मंगेश कौटकर व इतर यांचेकडून हस्तांतरणीय विकास हक्काचे खरेदीखत दस्ताने घेतलेले असुन, सदर दस्त दिनांक:०७/०६/२०२३ मे. दुय्यम निबंधक सो., नाशिक-७ यांचे कार्यालयात अ.क्र. ६४२२ अन्वये नोंदविलेला आहे.

४) परिशिष्ट-१ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीवर लिहून देणार यांना मालकी अधिकारात टिडीआर वापरुन रहीवाशी बांधकाम करण्याचा व ते विक्री करण्याचा पुर्णपणे हक्क व अधिकार आहे.

५) लिहून देणार यांनी सदर करारनाम्यातील प्लॉट मिळकतींवर फ्लॅट बांधण्याकरीता प्लॅन तयार करुन घेऊन बांधकामाचा प्लॅन नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेकडील इमारतीचे बांधकाम सुरु करण्याबाबत कमेन्समेंट सर्टिफेकट क्र. LND/BP/B1/BP/62 दिनांक: १४/०६/२०२३ अन्वये घेतलेले असुन, प्लॉट मिळकतींवर मंजुर प्लॅनप्रमाणे बांधकाम सुरु केलेले आहे.

६) लिहून देणार यांचे मालकी हक्कांबाबत संपुर्ण कागदपत्रांची लिहून घेणार यांनी पाहणी व तपासणी करुन घेऊन तसेच लिहून देणार हे करीत असलेल्या बांधकामाच्या दर्जाची, स्वरुपाची खात्री करुन घेतलेली आहे. तसेच या करारनाम्यातील परिशिष्ट ३ मध्ये नमुद करण्यात आलेल्या व फ्लॅट मध्ये देण्यात येणाऱ्या सुखसोयीची खात्री करुन लिहून घेणार यांचे समाधान झालेले आहे, असे कबुल करुन मिळकतीत बांधकाम करीत असलेल्या परिशिष्ट-

CK Sahoo

A. G. BAFANA
Advocate & Notary
16, Suyojit Trade Centre, Below Lokmat Office,
B/h. Nandan Plywoods, Sharanpur Road, Nashik
E.D.22/9/2025

२ यात वर्णन केलेली फ्लॅट मिळकत खरेदी घेण्याचे ठरविले, त्यानुसार लिहून घेणार व लिहून देणार यांचे दरम्यान बोलणी होऊन सदर फ्लॅट मिळकत खालील शर्तीवर घेण्याचा व देण्याचा करार झाला आहे. तो येणेप्रमाणे...

**फ्लॅट विक्री कराराच्या अटी व शर्ती**

१) सदर करारनाम्यातील परिशिष्ट - १ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतींवर परिशिष्ट-२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे स्वामी निवास या इमारतीतील तिसरा मजल्यावरील फ्लॅट नं. ३०२ (१बीएचके) यासी कारपेट क्षेत्र ३७.६२ चौ.मी. + बाल्कनी क्षेत्र ५.७५ चौ.मी. इतके लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना रक्कम रुपये १८,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये अठरा लाख मात्र) चे मोबदल्यात विक्री करण्याचे ठरविले आहे. सदरची किमंत आजचे बाजारभावाप्रमाणे योग्य वाजवी असुन, सदर किमंतीबाबत उभयंतांचे दरम्यान वाद अगर तक्रार नाही. सदरची रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना यापुढे भरणा तपशिलात वर्णन केल्याप्रमाणे दिली व द्यावयाची आहे. ही या कराराची महत्वाची अट व शर्त आहे. भरण्याचा तपशिल पुढीलप्रमाणे दिलेला आहे.

| रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|
| १,००,०००/- | अक्षरी रुपये एक लाख मात्र लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना चेक नं. २१०१८७ दिनांक: ०५/ |

CK sahoo

A. G. BAFANA
Advocate & Notary
16, Suyojit Trade Centre, Below Lokmat Office,
B/h. Niranjan Plywoods, Sharanpur Road, Nashik-2
E.D.22/9/2025

१२/२०२४ रोजीचा स्टेट बँकऑफ इंडीया, सातपुर शाखा, नाशिक या बँकेवरील दिलेला आहे.

| | |
|---|---|
| ५०,०००/- | अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना चेक नं. २१०१८८ दिनांकः ०७/१२/२०२४ रोजीचा स्टेट बँकऑफ इंडीया, सातपुर शाखा, नाशिक या बँकेवरील दिलेला आहे. |
| १६,५०,०००/- | अक्षरी रुपये सोळा लाख पन्नास हजार मात्र लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना स्टेट बँक ऑफ इंडीया या वित्तीय संस्थेकडील मंजुर कर्जाद्वारे १ महीना मुदतीत द्यावयाचे आहे. |
| १८,००,०००/- | अक्षरी रुपये अठरा लाख मात्र |

उर्वरीत रक्कम लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना वर नमुद केलेल्या मुदतीत अदा करावयाची आहे

२) वर नमुद केल्याप्रमाणे रक्कम दिलेल्या वेळी अदा करणे ही या कराराची महत्वाची शर्त आहे. मात्र सदरील रक्कमेची लेखी स्वरुपात मागणी करुनही लिहून घेणार यांनी दिलेल्या वेळी रक्कम अदा न केल्यास प्रस्तुतचा करारनामा लिहून देणार यांना रद्द करण्याचा अधिकार राहील व त्यासाठी कोणताही वेगळा दस्त करण्याची आवश्यकता राहणार नाही. अशा परिस्थितीत सदरची मिळकत अन्य त्रयस्थ व्यक्तिस विक्री करण्याचा लिहून देणार यांना हक्क प्राप्त होईल व अशाप्रकारे लिहून देणार यांनी सदरची

CK Sahoo

A. G. BAFANA
Advocate & Notary
16, Suyojit Trade Centre, Below Lokmat Office
Bh. Bhanjan Plywoods, Sharanpur Road, Nashik-2
E.D.22/9/2025

मिळकत अन्य तिऱ्हाईत इसमास विक्री केल्यानंतर व त्यांचेकडून किमंतीची रक्कम मिळाल्यानंतर लिहून घेणार यांनी अदा केलेल्या रक्कमेतुन खर्चाची १०% रक्कम कपात करुन उर्वरीत रक्कम लिहून देणार लिहून घेणार यांना बिनव्याजी परत करतील.

३) सदर फ्लॅटचा प्रत्यक्ष कबजा लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना ९ महीने मुदतीत देण्याचा आहे. मात्र संपुर्ण रकमेचा भरणा लिहून घेणार यांनी करारनाम्यात नमुद केलेल्या कालावधीत लिहून देणार यांना द्यावयाचा आहे. संपुर्ण भरणा मिळालेशिवाय लिहून घेणार यांना कबजा मिळणार नाही. ही या कराराची महत्वाची अट व शर्त आहे.

४) सदर करारनाम्यातील अटी व शर्तींची पुर्तता केल्याशिवाय लिहून घेणार यांना सदर फ्लॅट मिळकतीबाबत कोणताही मालकी हक्क प्राप्त होत नाही. तसेच सदर करारातील शर्तींची पुर्तता केल्याशिवाय व लिहून देणार यांची लेखी परवानगी घेतल्याशिवाय सदर फ्लॅट मिळकत गहाण, दान, लीन, लीज, अन्नवस्त्र, विक्री भाडेपट्टा वगैरे जडजोखमीत अगर अन्यरितीने हस्तांतरीत करण्याचा हक्क लिहून घेणार यांना प्राप्त होणार नाही.

५) करारनाम्याप्रमाणे फ्लॅटचे बांधकाम पुर्ण झाल्याबाबत व राहण्यासाठी उपलब्ध झाल्याबाबत लिहून घेणार यांना लिहून देणार यांनी लेखी नोटीस दिल्यापासुन आठ

CK Sahoo

A. G. BAFANA
Advocate & Notary
16, Suyojit Trade Centre, Below Lokmat Office,
B/h. Niranjan Plywoods, Sharanpur Road, Nashik-2
E.D.22/9/2025

दिवसाचे आत लिहून घेणार यांनी त्यांचेकडे येणे असलेली रक्कम लिहून देणार यांचेकडे जमा करावयाची आहे. लिहून घेणार यांना सुचना मिळाल्यानंतर व सर्व रक्कम दिल्यानंतर फ्लॅट चा कबजा/ताबा लिहून देणार हे लिहून घेणार यांना देतील.

६) प्रस्तुत करारनाम्यातील परिशिष्ट-२ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीचा कबजा लिहून देणार हे लिहून घेणार यांना ठरलेल्या मुदतीत देणार आहेत. तथापि सदरील मिळकतीचा कबजा काही कारणांमुळे किंवा घटनांमुळे जसे सिमेंट, मजूर व इतर बिल्डींग साहीत्य वेळोवेळी न मिळाल्याने तसेच पुर, भुकंप किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती, युध्द वगैरे घटनेमुळे किंवा सरकारी अथवा महानगरपालिका यांच्या धोरणातील बदलांमुळे अडचणी निर्माण झाल्यास व त्यामुळे इमारतीचे बांधकाम रोखले जावून सदरच्या मिळकतीचा कबजा लिहून घेणार यांना देण्यास दिरंगाई झाल्यास त्याबाबत लिहून घेणार यांची लिहून देणार यांचे विरुध्द कोंहीएक तक्रार असणार नाही.

७) स्थानिक स्वराज्य संस्था, शासन जे कायदे, नियम, अधिनियम करतील त्यांचे पालन करण्याची जबाबदारी लिहून घेणार यांचेवर बंधनकारक राहील. तसेच फ्लॅट मिळकत ज्या कारणाकरीता वापर करण्याची परवानगी मंजुर झालेली आहे, त्या कारणाकरीताच मिळकतीचा उपभोग लिहून घेणार यांनी वंशपरंपरागत घेण्याचे मान्य

CK sahoo

A. G. BAFANA
Advocate & Notary
16, Sanyojit Trade Centre, Below Lokmat Office, B/h. Himalayan Plywoods, Sharanpur Road, Nashik-2
E.D. 22/9/2025

व कबुल केलेले आहे.

८) परिशिष्ट १ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतींवर लिहून देणार हे मंजुर इमारत नकाशान्वये स्वामी निवास या नावाने बांधकाम सुरु केलेल्या इमारतीतील फ्लॅट बांधकाम धारकांची एकत्रित अशी संस्था अगर अपार्टमेंट लिहून देणार हे करुन देतील. त्याचे सर्व नियम व अधिनियम लिहून घेणार यांचेवर बंधनकारक राहतील व त्याकामी सर्व ते सहकार्य लिहून घेणार हे करतील.

९) सदर सदर फ्लॅट मिळकत खरेदीकामी लिहून घेणार यांना कोणत्याही वित्तीय अगर अन्य संस्थेकडून कर्ज घ्यावयाचे असल्यास ते लिहून घेणार यांनी स्वतःच्या जबाबदारीवर घ्यावयाचे आहे व त्याची परतफेड करण्याची संपुर्ण जबाबदारी लिहून घेणार यांचेवर राहील. सदर कर्ज मिळणेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व कागदपत्रांची पुर्तता व त्याकामी सर्व ते सहकार्य लिहून देणार हे करतील.

१०) सदरचा करारनामा हा महाराष्ट्र ओनरशीप फ्लॅटस् ॲक्ट १९६३ व अपार्टमेंट ॲक्ट १९७० चे तरतुदीप्रमाणे करुन दिलेला आहे.

११) सदर करारनाम्यात लिहून घेणार यांनी जो पत्ता दिलेला आहे त्या पत्त्यावर लिहून देणार यांचेकडून संबंधीत पत्रव्यवहार केला जाईल व लिहून घेणार यांना तो मिळालेला आहे असे गृहीत धरण्यात येईल.

१२) सदर इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यावर व बांधकाम

CK school

A. G. BAFANA
Advocate & Notary
16, Suyojit Trade Centre, Below Lokmat Office,
B/h Niranjan Plywoods, Sharanpur Road, Nashik-2.
E.D.22/9/2025

पुर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर व फ्लॅट मिळकतीचा कबजा दिल्यानंतर सदर इमारतीमधील सर्व फ्लॅट धारकांनी लागणारा खर्च जसे सामाईक विद्युत आकार, मेन्टेनन्स चार्जेस, पाणी आकार, लिफ्ट मेन्टेनन्स व इतर सामाईक खर्च वगैरे सामाईकपणे भरावयाचे व सोसावयाचे आहेत.

१३) लिहून घेणार यांनी सदर मिळकत कबजात घेतल्यानंतर मिळकतीबाबत खालीलप्रमाणे बाबी लिहून घेणार मान्य करीत आहे की,

अ) लिहून घेणार हे सदर मिळकत सुज्ञ माणसाप्रमाणे वापरतील व तिचे किरकोळ, दुरुस्ती वगैरे सर्व लिहून घेणार हेच करतील. तसेच ओपन स्पेस व पार्कींग अेरीया याचा वापर हा नियम बाह्यरित्या करणार नाही.

ब) तसेच लिहून घेणार हे सदर मिळकतीस व संपुर्ण इमारतीस धोका पोहचेल असे कोणतेही प्रकारचे ज्वालग्राही पदार्थ, सदर मिळकतीत साठविणार नाही. तसेच कोणत्याही अवजड वस्तु वरील मजल्यावर नेणार नाही. जेणेकरुन जिना, सामाईक जागा इ. यांचे नुकसान होणार नाही.

क) लिहून घेणार हे सदरील मिळकतीचे आजचे स्थितीत कोणत्याही प्रकारचा बदल करणार नाही. अगर मिळकतीचे स्वरुपात कोणत्याही प्रकारचा बदल करणार नाही. अगर मिळकतीचे कोणतेही बांधकाम पाडून नविन बांधकाम करणार नाही. तसेच सदर मिळकतीचे बाहेरील बाजुकडील

Ck Saboo

A. G. BAFANA
Advocate & Notary
F.D. 22/9/2025

रंग बदलणार नाही.

ड) सदर मिळकतीचे परीसरात तसेच कंपाऊंडमध्ये लिहून घेणार हे कोणत्याही प्रकारची घाण, कचरा, टाकणार नाही, तसेच मिळकतीचे सभोवतालचा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवावयाचा आहे.

इ) सदर मिळकतीचा अंतिम दस्त लिहून देणार हे लिहून घेणार यांचे लाभात लिहून व नोंदवुन देईपावेतो लिहून देणार यांना व त्यांचेतर्फे त्यांचे नोकरचाकर, सर्व्हेअर, इंजिनियर यांना मिळकतीत जाणेयेणेचा हक्क व अधिकार राहील.

१४) सदरचा करारनामा हा लिहून घेणार व लिहून देणार यांचेवर तसेच त्यांचे पश्चात त्यांचे वालीवारस व हक्क सांगणारे या सर्वांवर बंधनकारक आहे व राहील.

१५) सदर फ्लॅट मिळकतीच्या किमंतीमध्ये विद्युत कनेक्शनकामी, लाईट मीटर, कॉमन नळ कनेक्शन इ. कामी लागणारा खर्च समाविष्ट केलेला आहे.

१६) सदर फ्लॅट विक्री करारनामा दस्तातील प्लॉट मिळकतीचे क्षेत्र हे २८८.०० चौ.मी. असुन, इमारतीत एकुण १५ फ्लॅट मिळकती असल्याने रेरा कायद्यातील तरतुदी लागु होत नाही.

१७) सदर फ्लॅट विक्री करारनाम्याचा संपुर्ण खर्च जसे स्टॅम्प, नोंदणी फी, वकील फी, टायपिंग, झेरॉक्स व इतर अनुषंगिक खर्च हा लिहून देणार यांनी केलेला आहे.

परिशिष्ट-१

CK 50000

A. G. BAFANA
Advocate & Notary
16, Suyojit Trade Centre, Below Lokmat Office,
B/h. Niranjan Plywoods, Sharanpur Road, Nashik-2
E.D.22/9/2025

तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी, नाशिक महानगरपालिका नाशिक यांचे हद्दीतील, नाशिक सब-रजिस्ट्रार हद्दीतील, मौजे गंगापुर या गावचे शिवारातील सर्व्हे नं. १२४/२/१ या मिळकतीमधील अंतिम मंजुर ले-आऊटपैकी **प्लॉट नं. ३१** यासी क्षेत्र २८८.०० चौ.मी. यासी सिसनं. २१४७ क्षेत्र २८८.०० चौ.मी. यासी चतु:सिमा येणेप्रमाणे:-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | प्लॉट नं. ३२. |
| पश्चिमेस | : | प्लॉट नं. ३०. |
| दक्षिणेस | : | ९ मी. कॉलनी रोड. |
| उत्तरेस | : | ओपन स्पेस. |

येणेप्रमाणे चतु:सिमेतील प्लॉट मिळकत जल, तरु, काष्ट, पाषाण, निधी निक्षेपासह, तदंगभुत वस्तुंसह, तसेच ले-आऊट मधील ओपन स्पेस व कॉलनी रस्ते सामाईक वापरण्याचे हक्कासह दरोबस्त मिळकत.

**परिशिष्ट-२**

वर परिशिष्ट १ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीवर नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेकडील मंजुर बांधकाम पत्र क्र. LND/BP/B1/BP/62 दिनांक: १४/०६/२०२३ अन्वये बांधकाम सुरु केलेल्या स्वामी निवास या इमारतीतील तिसरा मजल्यावरील **फ्लॅट नं. ३०२ (१बीएचके)** यासी कारपेट क्षेत्र **३७.६२ चौ.मी. + बाल्कनी क्षेत्र ५.७५** चौ.मी. यासी चतु:सिमा येणेप्रमाणे:-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | : | मार्जिनल स्पेस. |
| पश्चिमेस | : | फ्लॅट नं. ३०३, लिफ्ट पॅसेज |
| दक्षिणेस | : | मार्जिनल स्पेस व रोड. |

CK sahoo

A. G. BAFANA
Advocate & Notary
16, Suyojit Trade Centre, Below Lokmat Office, Opp. Rajiv Gandhi Bhavan Plywoods, Sharanpur Road, Nashik-2
E.D. 22/9/2025

(93)



उत्तरेस : फ्लॅट नं. ३०१.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील बांधीव फ्लॅट मिळकत.

परिशिष्ट-३

फ्लॅट मिळकतीमध्ये द्यावयाच्या सुखसोयी

१) इमारतीचे संपुर्ण बांधकाम हे आर.सी.सी. स्ट्रक्चरमध्ये असेल.

२) बाहेरील भिंत ६ इंच व आतील भिंत ४ इंच थिक.

३) बाहेरील सॅण्डफेस प्लास्टर विथ बर्जर कंपनीचे रफ ॲण्ड टफ टेक्चर.

४) आतुन ट्रॅक्टर इम्लशन पेंट व बाहेरुन वेद्दर कोट कलर.

५) कन्सील्ड प्लंबींग.

६) सर्व रुममध्ये २४ X ४८ डिजीटल टाईल्स.

७) टॉयलेट व किचन १८ X १२ वॉल टाईल्स.

८) किचन प्लॅटफॉर्म ग्रेनाईट विथ स्टिल सिंक.

९) आकर्षक लॅमिनेट मेनडोअर विथ फ्रेम, इतर लॅमिनेटेड डोअर व टॉयलेटला पीव्हीसी डोअर.

१०) सर्व विंडो ॲल्युमनियम पावडर कोटींग थ्री ट्रॅक विथ एम.एस. सेफ्टी ग्रिल विथ ग्रेनाईट फ्रेम.

११) कन्सील्ड इलेक्ट्रीक फिटींग व आवश्यक पॉइंट.

१२) लिफ्ट बॅटरी बॅकअपसह.

येणेप्रमाणे फ्लॅट विक्री करारनामा लिहून देणार यांनी लिहून

CK sahoo

A. G. BAFANA
Advocate & Notary
16, Suyojit Trade Centre, Below Lokmat Office,
B/h. Niranjan Plywoods, Sharanpur Road, Nashik-2
E.D.22/9/2025

THIS DOCUMENT CONTAINS 14 PAGES

NOTED & Registered at Serial Number 538/2024 12/12/2024

98

-१४-

घेणार यांचे लाभात दोन साक्षीदारांचे समक्ष सह्या करुन लिहून व मे. दुय्यम निबंधक सो., नाशिक यांचे कार्यालयात नोंदवुन दिले असे.

हा फ्लॅट विक्री करारनामा.

नाशिक.

दिनांक:



के बी कन्स्ट्रक्शन्स तर्फे भागिदार

--------------------

श्री. सुरेश प्रभाकर क्षिरसागर

लिहून देणार





--------------------

१) श्री. कुमूदा शत्रुघन शाहू

--------------------

२) सौ. चंद्रिका कुमूदा शाहू

लिहून घेणार

साक्षीदार:-

१)............................ २)............................

BEFORE ME

A. C. BAFANA

ADVOCATE & NOTARY

Below Lokmat Office, Nashik-2

E.D. 22/9/2025

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA



सुरेश प्रभाकर क्षीरसागर
Suresh Prabhakar Kshirsagar
DOB: 01-06-1970
Gender: Male

7973 3755 2635

आधार - आम आदमी का अधिकार

भारत सरकार
Government of India



कुमुद शत्रुघ्न साहू
Kumuda Satrughan Sahoo
जन्म तारीख/DOB: 15/10/1977
पुरुष/ MALE

7342 0345 6980
VID : 9189 6210 1308 9313

माझे आधार, माझी ओळख

भारत सरकार
Government of India



चंद्रिका कुमुद साहू
Chandrika Kumuda Sahoo
जन्म तारीख/DOB: 09/11/1984
महिला/ FEMALE

7203 8670 7166
VID : 9199 0656 1700 0402

माझे आधार, माझी ओळख

NOTARY
A.G. BAFANA
REG. NO. 3146
COURT NASHIK
MAHARASHTRA
EXP.Dt. 22/9/2025
GOVT. OF INDIA

NOTARY
A.G. BAFANA
REG. NO. 3146
COURT NASHIK
MAHARASHTRA
EXP.Dt. 22/9/2025
GOVT. OF INDIA